राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका, विशेष नियोजन प्राधिकरणे, प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता विकास योजना व शहर सौंदर्यीकरण यांचे प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी संरचना समिती Urban Design Cell ची स्थापना करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. टिपीएस-१८२५/१७२/प्र.क्र.२९/२०२५/नवि-१३**
मुख्य इमारत, ४ था मजला, मादाम कामा मार्ग
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दि : २८.०३.२०२५**

# आदेश

**प्रस्तावना :-**

I. राज्यातील नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रातील नागरकिंना भौतिक व सामाजिक सोयीसुविधा सुनियोजित दृष्ट्या उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीकोनातून नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्राकरिता विकास योजना तयार करण्यात येते. सदर विकास योजनेचा अंमलबजावणीबाबत कालावधी हा २० वर्ष निश्चित करण्यात आला आहे.

II. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या प्रादेशिक योजना शासनाने मंजूर केल्या असून, संपूर्ण क्षेत्र नियोजनाखाली आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात एकूण ४२१ नियोजन प्राधिकरणे असून, त्यापैकी २८ महानगरपालिका, १३ अ वर्ग नगरपरिषदा, ७३ ब-वर्ग नगरपरिषदा, १४८ क वर्ग नगरपरिषदा व १५५ ड-वर्ग नगरपंचायती सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. उक्त विकास योजनांपैकी २९८ विकास योजना मंजूर असून उर्वरित विकास योजना मंजूरीच्या प्रक्रियेत आहेत.

III. सदर विकास योजना / प्रादेशिक योजना तयार करण्यामागे प्रमुख उद्देश हा रहिवास औद्योगिक, वाणिज्य, कृषी, इ., सारख्या प्रयोजनासाठी जमिनींच्या वापराचे नियोजन करणे, नागरिकांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे, शहरातील सृष्टी-सौंदर्याची ठिकाणे दर्शनीय भूभाग, ऐतिहासिक, नैसर्गिक, वास्तुशास्त्रीय, वैज्ञानिक आणि शैक्षणिक दृष्ट्या महत्व असलेल्या जागेंचे जतन करणे तसेच सामूहिक सुखसोयी व सुविधा या साठी शहराचे सुनियोजन करणे हा प्रमुख उद्देश आहे.

IV. महाराष्ट्र राज्यातील विविध शहरे पाहता, प्रत्येक शहराची स्वत:ची विशिष्ट संस्कृती असून त्यास पार्श्वभूमी आणि वैशिष्ट्यपूर्ण असे महत्व आहे. सदर शहराच्या विशिष्ट सौंदर्यीकरणाचे दृष्टीने (aesthetic point of view) आरोग्य सुविधा, वाहतूक व दळण वळण सेवा सुविधा या दृष्टीकोनातून विकास योजनेची / प्रादेशिक योजनेची अधिक परिणामक दृष्ट्या अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने सदर विकास योजना / प्रादेशिक योजना क्षेत्राचा सुनियोजित दृष्ट्या विकास होणे आवश्यक झाले आहे.

V. राज्यातील शहरे वाढत आहेत तसेच काही नवीन शहरे जलद गतीने उदयास येत आहेत .त्यामुळे सदर नागरी क्षेत्रामधील व्यवसायांना चालना मिळण्याची तसेच शहरांचे सौंदर्यीकरण अबाधित रहावे या उद्देशाने तसेच सदर शहरामधील व्यवसाय आणि पर्यटन दोन्हीला चालना देण्याच्या उद्देशाने नियोजन प्राधिकरणाचे / विशेष नियोजन प्राधिकरण व संचालनालयाचे स्तरावर नागरी संरचना विभाग (Urban Design Cell) स्थापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. जेणेकरुन सदर नागरी संरचना विभागाशी सल्लामसलत करुन नियोजन प्राधिकरणाचे स्तरावर शहराचा विकास व सौंदर्यीकरणाबाबत निर्णय तात्काळ घेऊन अंमलबजावणी करणे शक्य होईल.

VI. उक्त बाबी विचारात घेता, राज्यातील नगरपालिका, महानगरपालिका, विशेष नियोजन प्राधिकरणे, प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता विकास योजना व शहर सौंदर्यीकरण यांचे प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नागरी संरचना विभाग (Urban Design Cell) ची स्थापना करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे. या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे नागरी संरचना विभाग (Urban Design Cell) ची स्थापना करण्यात येत आहे.

**I. "अ" व "ब" वर्ग महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरणे यांचे कार्यक्षेत्रामध्ये संबंधित आयुक्त / महानगर आयुक्त यांचे सनियंत्रणाखालील नागरी संरचना विभाग (Urban Design Cell) :-**

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त/ महानगर आयुक्त/विशेष नियोजन प्राधिकरणाचे प्रशासकीय प्रमुख | अध्यक्ष |
| २ | महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरणे यांचे आस्थापनेवरील उपसंचालक, नगर रचना / सहायक संचालक नगर रचना | विभाग प्रमुख |
| ३ | महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरणे यांचे आस्थापनेवरील शहर अभियंता | सदस्य |
| ४ | शहरातील इतिहास/ हेरिटेज क्षेत्रातील अनुभव असलेली तज्ञ व्यक्ती | सदस्य |
| ५ | शहर / नागरी क्षेत्राचे नियोजन (City/Urban Planning) या विषयामध्ये अनुभव असलेले वास्तुविशारद / अभियंता | सदस्य |
| ६ | स्टक्चरल इंजिनिअर, दहा वर्षाहून अधिक वर्षे अनुभव असलेले व इन्स्टिट्युट ऑफ इंजिनियर्सचे सदस्य | सदस्य |
| ७ | शहराचे सौंदर्यीकरण या विषयामध्ये अनुभव असलेले शहरातील ज्येष्ठ नागरीक किंवा विशेष निमंत्रित सदस्य | सदस्य |

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
सत्यमेव जयते

II. **उक्त अनुक्रमांक (i) वगळता राज्यातील अन्य सर्व महानगरपालिका अथवा, जिल्हास्तरीय / प्रादेशिक योजना कार्यक्षेत्रामध्ये संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे सनियंत्रणाखालील दोन स्वतंत्र युनिटची Urban Design Cell ची निर्मिती खालीलप्रमाणे करण्यात येत आहे :-**

| | | |
|---|---|---|
| १ | उप संचालक, नगर रचना वाहतुक व परिवहन घटक, पुणे / छत्रपती संभाजीनगर | विभाग प्रमुख |
| २ | जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी त्यांनी नियुक्त केलेला सक्षम महसूल अधिकारी किंवा उपविभागीय अधिकारी / नगरपरिषद स्तरावर मुख्याधिकारी, संबंधित नगरपरिषद | सदस्य |
| ३ | सहायक संचालक / नगर रचनाकार, वाहतुक व परिवहन घटक | सदस्य |
| ४ | सहायक संचालक, नगर रचना जिल्हा शाखा कार्यालय | सदस्य सचिव |
| ५ | शहरातील इतिहास, हेरिटेज, शहराचे सौंदर्यीकरण(City/Urban Planning) क्षेत्रातील वास्तुविशारद, अभियंता अथवा सदर विषयी अनुभव असलेली तज्ञ विशेष निमंत्रित व्यक्ती | सदस्य |

**०३. उपरोक्त गठीत नागरी संरचना समितीचे कार्य खालीलप्रमाणे राहील :-**

I. सदर नागरी संरचना विभागाने त्यांचे कार्यक्षेत्राचे सौंदर्य शहराचे मूळ वैशिष्ट्य अबाधित राहण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक ते डिझाईन तयार करावे तसेच संबंधित अधिकाऱ्यांसोबत चर्चा करुन त्यांचे कार्यक्षेत्राशी संबंधित योजना / प्रस्ताव / निती तयार करण्यात यावी. तसेच विकास योजना / प्रादेशिक योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना प्राधिकरणास सुचविण्यात याव्यात.

II. सदर कार्यक्षेत्रासाठी आवश्यक तो मास्टर प्लॅन तसेच तपशीलवार लेआऊट तयार करण्यात यावा. तसेच सदर शहराकरिता वास्तुशैली / हेरिटेज स्थळे यांचे सौंदर्यीकरण इ., अबाधित राहण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक तो डिजाईन प्रस्ताव आणि मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात यावी. तसेच ती वेळोवेळी प्रसिध्द करण्यात यावी.

III. जिल्हास्तरीय नागरी संरचना समितीने वित्तीय व्यवसाय जिल्हे, सार्वजनिक निवासी शहरे, ट्रांझिट-ओरिएंटेड विकास, (TOD) मिश्रित वापर विकास, वॉटरफ्रंट विकास आणि इतर प्रमुख व प्रमुख प्रकल्पांसाठी शहरी डिझाईन मार्गदर्शक तत्त्वांसह साइट-विशिष्ट मास्टर योजना आणि स्थानिक क्षेत्र योजना ओळखणे, रेखाटणे आणि तयार करावीत.

IV. सदर नागरी संरचना विभगाच्या सदस्यांनी नागरी क्षेत्रामधील व्यवसायांना चालना मिळण्याची तसेच शहरांचे सौंदर्यीकरण अबाधित रहावे या उद्देशाने तसेच सदर शहरामधील व्यवसाय आणि पर्यटन दोन्हीला चालना देण्याच्या उद्देशाने व शहरातील / जिल्ह्यातील ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाच्या असलेल्या वास्तू / हेरिटेज वास्तू / नद्या / तळी / किल्ले / मंदिरे इ., वास्तूंच्या परिसराचे सौंदर्यीकरण अबाधित राहण्याच्या दृष्टीकोनातून नियोजन प्राधिकरण / जिल्हाधिकारी यांना आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यात याव्या व त्याची अंमलबजावणी होत आहे याची देखील दक्षता घ्यावी.

नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-32. सत्यमेव जयते

V. सदर नागरी संरचना विभागाच्या सदस्यांनी रहिवास औद्योगिक, वाणिज्य, कृषी, इ., सारख्या प्रयोजनासाठी जमिनींच्या वापराचे नियोजनबध्द विकास होण्याच्या दृष्टीकोनातून तसेच नागरिकांना आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात. यासाठी व शहरातील सृष्टी-सौंदर्याची ठिकाणे दर्शनीय भूभाग, ऐतिहासिक, नैसर्गिक, वास्तुशास्त्रीय, वैज्ञानिक आणि शैक्षणिक दृष्ट्या महत्व असलेल्या जागेंचे जतन करणेकरण्याच्या दृष्टीकोनातून नियोजन प्राधिकरणास / जिल्हाधिकारी यांना आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यात याव्यात.

VI. सदर नागरी संरचना विभागाने शहरातील रस्त्यांचे / चौकांचे तसेच रस्त्याचे लगत दोन्ही बाजूस सुयोग्य रंगसंगती, सौंदर्यीकरणाच्या व वाहतूक दळणवळण सोयीच्या दृष्टीकोनातून नियोजन करावे. आणि योग्य ते सुशोभिकरणाचे डिजाईन तयार करावे.

VII. तसेच विभागास आवश्यक असल्यास सदर विषयाशी संबंधित तज्ञ व्यक्तीची नेमणूक करण्याचे अधिकार समितीच्या अध्यक्षांना राहतील.

VIII. सदर नागरी संरचना विभागाच्या सदस्यांनी शहराचे विशिष्ट संस्कृती / पार्श्वभूमी आणि वैशिष्ट्यपूर्ण असे महत्व विचारात घेऊन शहराच्या विशिष्ट aesthetic point of view आरोग्य सुविधा, वाहतूक व दळण वळण सेवा सुविधा या दृष्टीकोनातून व विकास योजनेची अधिक परिणामक दृष्ट्या अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने तसेच सदर विकास योजना / प्रादेशिक योजना क्षेत्राचा सुनियोजित दृष्ट्या विकास होण्याच्या दृष्टीने नियोजन प्राधिकरणास / जिल्हाधिकारी यांना आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यात याव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in (कायदे/ नियम ) या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.***

**(डॉ.प्रतिभा भदाणे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत माहितीस्तव :-**

१) मा.मुख्यमंत्री महोदय, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदय, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) महोदय, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदया, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६) अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

९) उप सचिव तथा उप संचालक, नगर रचना (नवि-११) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रति:-**

१. सर्व विभागीय महसूल आयुक्त, कोकण / पुणे / नाशिक / नागपूर / अमरावती/ छत्रपती संभाजीनगर विभाग.

२. सर्व विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नाशिक / नागपूर / अमरावती/ छत्रपती संभाजीनगर विभाग.

३. सर्व जिल्हाधिकारी.

४. आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका.

५. संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे.

६. उप संचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे.

७. उप संचालक, नगर रचना वाहतुक व परिवहन घटक, पुणे / छत्रपती संभाजीनगर

८. महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे / सर्व विशेष नियोजन प्राधिकरणे.

९. सर्व नवनगर विकास प्राधिकरणे.

१०. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४०० ४१६.

११. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे.

१२. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.

१३. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई.

१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.

१५. सहायक संचालक, नगर रचना सर्व शाखा कार्यालय.

१६. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

**********************************

नगर विकास विभाग, सत्यमेव जयते, मंत्रालय, मुंबई-32.